# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/10/2023 (मंगळवार) दुपार


### अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रालीवर कारवाई करून एकुण ०६,०४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त पोलीस स्टेशन मौदाची कारवाई

दि. ०१/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान मुखबीरद्वारे मिळालेल्या माहितीवरून मौजा झुल्लर फाटा मौदा येथे अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक होत आहे. या माहिती वरून फिर्यादी हे हायवे क्र. एन एच.— ५३ वर पेट्रोलींग करित असता झूल्लर फाटा मौदा येथे अवैधरित्या व विनापरवाना वाळूची चोरटी वाहतुक करणाऱ्या सिल्वर रंगाचा आयशर कंपनीचा ट्रॅक्टर लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॅक्टरची ट्रॉलीचा चालक **आरोपी नामे— यशवंत नत्थुजी मोटघरे, वय ४२ वर्ष, रा. झूल्लर फाटा मौदा** याने आपल्या वाहनामध्ये रेती भरून दिसुन आल्याने त्यातील आरोपीच्या ताब्यातुन एक ब्रास रेती किंमती ४,०००/—रू. व ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/सी ए.—५७४६ किंमती ५,००,०००/— रू. व एक लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॅक्टरची ट्रॉली किंमती अंदाजे १,००,०००/— रू. असा एकुण ६,०४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोलीस हवालदार संदीप कडु ब. नं. ४१८ पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक फौजदार प्रतिभा तेलगोटे मो. क्र. ९०४९१६७६५३ या करीत आहे.

### चोरी करण्याचा प्रयत्न

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत रिजनल एरीया सिल्लेवाडा येथे दिनांक ०२/१०/२०२३ चे १४.०० वा. ते १४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— भोजराज नथ्थुजी मस्के, वय ५७ वर्ष, रा. नविन गुजरखेडी पोस्ट माळेगांव ता. सावनेर हे एम. एस. एफचे कर्मचारीसह रिजनल स्टोर एरीया सिल्लेवाडा (WCL) येथे हजर असता नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी नामे— पियुश वर्मा, वय ३० वर्ष, रा. चनकापुर, २ विधीसंघर्ष बालक हे लोखंड चोरी करण्याचा प्रयत्न करतांना दिसून आल्याने एम. एस. एफचे कर्मचारी यांनी पाठलाग करून पकडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. ०२ विधीसंघर्ष बालक असल्याने त्यांचे पालकाचे ताब्यात दिले. आरोपी पियुष वर्मा फरार असुन त्याचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राठोड पोस्टे खापरखेडा मो. नं. ८८०६८२८५६२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर